पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी- ४११ ०१८.

**मा.महिला व बालकल्याण समिती**

कार्यपत्रिका क्रमांक - **०४**

**सभावृत्तांत**

दिनांक - **२३/१२/२०२१** वेळ - दुपारी **२.३०** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मामहिला व बालकल्याण समितीची **पाक्षिक** सभा **गुरुवार** दिनांक **२३/१२/२०२१** रोजी दुपारी **२.३०** वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात मा.उप सचिव महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग यांचे कडील पत्र.क्र.कोरोना - २०२०/प्र.क्र७६/नवि/-१४ दि.२२ ऑक्टोंबर २०२१ अन्वये आयोजित करणेत आली होती. सदर सभेत खालीलप्रमाणे सन्मा.सदस्य सभागृहात उपस्थित होते.

**१. मा.सविता बाळकृष्ण खुळे - सभापती**
२. मा. योगीता ज्ञानेश्वर नागरगोजे
३. मा.काटे स्वाती (माई) चंद्रकांत
४. मा.गोफणे अनुराधा देविदास

या शिवाय मा. उल्हास जगताप - नगरसचिव, मा. सुहास बहाद्दरपुरे - समाज विकास अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आले.

विषय क्र.१) केरळ राज्य अभ्यास दौ-याचे आयोजन बाबत.
मा.योगीता नागरगोजे व अनुराधा गोफणे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.२) जेष्ठ नागरिक संघांकरिता L.E.D. कलर टी.व्ही. वाटप करणेबाबत.
मा.योगीता नागरगोजे व अनुराधा गोफणे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.३) लाईट हाऊस रोजगार निर्मितीचा प्रकल्प राबविणेबाबत.
मा.योगीता नागरगोजे व स्वाती (माई) काटे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.४) MSCIT प्रशिक्षण राबविणेबाबत.
मा.योगीता नागरगोजे व स्वाती (माई) काटे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.५) पवनाथडी जत्रा राबविणेबाबत.
मा.योगीता नागरगोजे व मा.अनुराधा गोफणे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.६) कृष्ठपिडीत व्यक्तिंना चादर, ब्लँकेट वाटप करणेबाबत.
मा.योगीता नागरगोजे व मा.स्वाती (माई) काटे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.७) महिला बचत गटांना अनुदान वाढविणेबाबत.
मा.अनुराधा गोफणे व मा.योगीता नागरगोजे यांचा प्रस्ताव.

----------

अ) मा. महिला व बालकल्याण समिती सभा (कार्यपत्रिका क्रमांक **०३**) दिनांक १५/१२/२०२१ चा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

----------

**सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले**.

ठराव क्रमांक - ६ विषय क्रमांक - ०१

दिनांक - २३/१२/२०२१

सुचक - मा.योगीता नागरगोजे अनुमोदक - मा.अनुराधा गोफणे

संदर्भ - मा.योगीता नागरगोजे व मा.अनुराधा गोफणे यांचा प्रस्ताव.

नागरवस्ती विकास योजना विभागामार्फत महिलांसाठी विविध प्रकारचे कल्याणकारी योजना राबविले जातात. या विभागामार्फत राबविण्यात येणा-या महिला व बालकल्याण योजने अंतर्गत नाविन्यपुर्ण योजना अधिक प्रभावीपणे राबविणे आवश्यक आहे. यासाठी महिला सक्षमी करणात आग्रेसर असलेला केरळ राज्यात "कुटुंब श्री" या प्रकल्पाला भेट देणे तसेच तेथील महिला सक्षमी करणाच्या कामकाजाची पाहणी करणे यासाठी केरळ राज्यात माहे जानेवारी २०२२ मध्ये महापालिकेचे मा.महापौर यांचेसह सन्मा.महिला पदाधिकारी, महिला नगरसदस्य व

संबंधित अधिकारी/कर्मचारी यांचा अभ्यास दौरा आयोजीत करण्यास व त्याकरिता होणा-या प्रत्यक्ष खर्चास वित्तीय व प्रशासकिय मान्यतेकामी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ७ विषय क्रमांक - ०२

दिनांक - २३/१२/२०२१

सुचक - मा.योगीता नागरगोजे अनुमोदक - मा.अनुराधा गोफणे

संदर्भ - मा.योगीता नागरगोजे व मा.अनुराधा गोफणे यांचा प्रस्ताव.

नागरवस्ती विकास योजना विभागामार्फत दरवर्षी १ ऑक्टोबर रोजी जागतीक जेष्ठ नागरिक दिन साजरा केला जातो. या दिनानिमित्त जेष्ठ नागरिक संघांना त्यांना आवश्यक असणा-या उपयुक्त वस्तु भेट स्वरुपात देण्यात येतात. यावर्षी जेष्ठ नागरिक महासंघ पिंपरी चिंचवड शहर यांनी त्यांच्या अंतर्गत असणाऱ्या १३४ जेष्ठ नागरिक संघांसाठी L.E.D. कलर टि.व्ही. ची मागणी केली असल्याने या १३४ जेष्ठ नागरिक संघांपैकी ज्या संघांकडे बंदिस्त जागा आहे. अशा संघांना L.E.D. कलर टी.व्ही. भेट स्वरुपात देण्यास मान्यता देणेकामी मा.स्थायी समिती सभेकडे वित्तीय मान्यतेकामी पाठविण्यास शिफारस करण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ८ विषय क्रमांक - ०३

दिनांक - २३/१२/२०२१

सुचक - मा.योगीता नागरगोजे अनुमोदक- मा.स्वाती (माई) काटे

संदर्भ - मा.योगीता नागरगोजे व मा. स्वाती (माई) काटे यांचा प्रस्ताव.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या नागरवस्ती विकास योजना विभाग आणि मे.लाईट हाऊस कम्युनिटी फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने महापालिकेच्या प्रत्येक क्षेत्रिय कार्यालयाच्या हद्दीमध्ये प्रत्येकी १ या प्रमाणे महानगरपालिकेच्या हद्दीतील १८ ते ३० वयोगटातील युवक / युवतींसाठी लाईट हाऊस रोजगार निर्मितीचा प्रकल्प राबविण्यास तसेच या प्रकल्पाकरिता मुलभुत सोयी सुविधा उदा.

जागा, फर्निचर, संगणक संच इ. विनामुल्य महापालिकेमार्फत उपलब्ध करुन देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ९ विषय क्रमांक - ०४

दिनांक - २३/१२/२०२१

सुचक - मा.योगीता नागरगोजे अनुमोदक- मा.स्वाती (माई) काटे

संदर्भ - मा.योगीता नागरगोजे व मा. स्वाती (माई) काटे यांचा प्रस्ताव.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या नागरवस्ती विकास योजनामार्फत शहरातील महिलांसाठी / युवतींसाठी विविध प्रकारच्या कल्याणकारी योजना राबविले जातात. यामध्ये महिलांना / युवतींना MSCIT प्रशिक्षण देणे ही योजना कार्यरत आहे. परंतु सदरची योजना औद्योगिक प्रशिक्षण देणे ही योजना कार्यरत आहे. परंतु सदरची योजना औद्योगिक प्रशिक्षण संस्था मोरवाडी यांच्यामार्फत राबविण्यात येते. या योजने अंतर्गत शहरातील जास्तीत जास्त महिलांना / युवतींना संगणक प्रशिक्षण देण्याच्या हेतुने औद्योगिक प्रशिक्षण संस्था, मोरवाडी यांचे मार्फत खाजगी संस्थांची निवड करणेस व त्यांचेमार्फत संगणक प्रशिक्षण देणेस मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - १० विषय क्रमांक - ०५

दिनांक - २३/१२/२०२१

सुचक - मा.योगीता नागरगोजे अनुमोदक- मा.अनुराधा गोफणे

संदर्भ - मा.योगीता नागरगोजे व मा. अनुराधा गोफणे यांचा प्रस्ताव.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या नागरवस्ती क्किास योजनामार्फत राबविण्यात येणा-या महिला व बालकल्याण योजनेअंतर्गत महिला बचतगटांनी उत्पादित

केलेल्या वस्तुंना बाजारपेठ उपलब्ध व्हावी, या हेतुने दरवर्षी पवनाथडी जत्रेचे आयोजन करण्यात येते. तरी सन २०२१-२०२२ या आर्थिक वर्षासाठी पी.डब्ल्यु.डी. ग्राऊंड, सांगवी येथे जानेवारी महिन्यात आयोजन करण्यास तसेच त्याकामी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेकामी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सदर ठराव कायम होणेची वाट न पाहता मा.स्थायी समिती सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ११ विषय क्रमांक - ०६

दिनांक - २३/१२/२०२१

सुचक - मा.योगीता नागरगोजे अनुमोदक- मा.स्वाती (माई) काटे

संदर्भ - मा.योगीता नागरगोजे व मा. स्वाती (माई) काटे यांचा प्रस्ताव.

नागरवस्ती विकास योजना विभागामार्फत महिलांसाठी विविध प्रकारचे कल्याणकारी योजना राबविले जातात. पिंपरी चिंचवड शहरात असलेल्या कृष्ठपिडीत व्यक्तिंची आर्थिक परिस्थिती ही हालकीची असल्याने प्रत्येक कृष्ठ पडित व्यक्तिंना १ चादर व १ ब्लँकेट वाटप करण्यास त्याकामी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेकामी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - १२ विषय क्रमांक - ०७

दिनांक - २३/१२/२०२१

सुचक - मा. अनुराधा गोफणे अनुमोदक- मा. योगीता नागरगोजे

संदर्भ - मा.अनुराधा गोफणे व मा.योगीता नागरगोजे यांचा प्रस्ताव.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमार्फत महिला बचत गटांना अनुदान दिले जाते. अनुदान देय कालावधी बाबत मा.महिला व बालकल्याण समिती ठराव क्र.२५, दिनांक-२५/०३/२०२१ रोजीचा ठराव रद्द करण्यास तसेच ज्या महिला बचत गटांना

१० वर्षे पुर्ण झालेले आहे अशा बचत गटांना १० वर्षांकरिता ५० हजार अनुदान देण्यास मान्यता देण्यात आहे.


सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**(सविता बाळकृष्ण खुळे)**
**सभापती**
महिला व बालकल्याण समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/०४/कावि/५६५/२०२१
दिनांक : २३/१२/२०२१



(उल्हास बबनराव जगताप)
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.